| |
|---|
| नि.फौ.ख.क्र. ११२६/२०१७ |
| सरकार -वि- रिना व ईतर |
| निशाणी क्र. ३८ |

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांची शपथेवर सरतपासणी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

| | | |
|---|---|---|
| **नांव** | : | संजय शंकर टेमगिरे, |
| **वय** | : | ३८ वर्षे, |
| **धंदा** | : | सहा. पोलीस निरीक्षक, उत्तर नियंत्रण कक्ष, मुंबई |
| **राहणार** | : | मुंबई |

**सरकार पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती जयश्री हेडाऊ यांचेमार्फत-**

१. दिनांक ०४.०४.२०१६ रोजी मी पोलीस उपनिरीक्षक म्हणून लकडगंज पोलीस स्टेशन येथे कार्यरत होतो. त्यादिवशी माझी डयुटी सकाळी ९.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत होती. मी डयुटीवर हजर असतांना सहा.पोलीस निरीक्षक एस. एस. मोले यांनी लेखी फिर्याद दिली, त्यानुसार मी अपराध क्र.३४१६/२०१६ कलम ३, ४, ७, ८ पीटा अधिनियमानुसार नोंदवून घेतली. आता मला छापील प्रथम खबर दिनांक ०४.०४.२०१६ दाखविण्यात आली. त्यावर दाखल अधिकारी म्हणून माझी सही आहे व फिर्यादी म्हणून ए.पी.आय. एस.एस. मोले यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ३९** देण्यात येते.

२. त्यानंतर मी आरोपी रिना धनावतला अटक केली व त्याबाबत अटक फार्म भरुन घेतला. मला आता अटक फार्म दिनांक ०४.०४.२०१६ दाखविण्यात आला. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **निशाणी ४०** देण्यात येते. आज आरोपी रिना न्यायालयासमक्ष हजर आहे.

**<u>उलट तपास आरोपीतर्फे आरोपीचे विद्वान विधीज्ञ अब्दुल अजीम यांचेमार्फत</u>**

३. फिर्यादी मोले यांनी फिर्याद देण्यापुर्वी ईतर कोणत्याही सामान्य नागरीकाने आरोपीविरुध्द फिर्याद दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की ए.पी.आय. मोले हे माझे वरिष्ठ अधिकारी होते. हे म्हणणे खरे आहे की, ते माझ्याच पोलीस स्टेशनला कार्यरत होते. हे म्हणणे खरे नाही की, पीटा अधिनियमाखाली पोलीस उपआयुक्त यांनी गुन्हयाचा तपास करणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे नाही की, मोले साहेबांनी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, त्यांच्या फिर्यादबाबत कोणतीही चौकशी न करता मी खोटा गुन्हा नोंदवून घेतला. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपी रिनाला खोटया प्रकरणात अटक केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**
**फेरतपास – नाही**
श्रवणोत्तर स्वीकृत

माझे समक्ष

ANAMIKA DEBASHISH BOSE
Digitally signed by ANAMIKA DEBASHISH BOSE
Date: 2025.12.11 17:59:13 +0530

( **अनामिका दे. बोस** )
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
नागपूर.

दिनांक ११.१२.२०२५